माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : ३६/२०२३**

**तक्रारकर्ता, श्री. रामप्रसाद अंतारामजी वैद्य,**

--विरुध्द--

**जन माहिती अधिकारी, तथा तलाठी,**
बोरगाव, सा.क्र.२०, पो. आसगाव ता. पवनी जि. भंडारा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
तहसिल कार्याल, पवनी ता. पवनी जि. भंडारा

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २५.१०.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपीलीय अधिकारी** : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक |
|---|---|---|
| ०७.०९.२०२२ | --- | २७.०२.२०२३ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. २१८३/२०२० मध्ये दिनांक ०७.०९.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २५.१०.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय बोरगाव, ता. पवनी ,जि. भंडारा श्री. एन. एस. गजभिये उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय पवनी ता.पवनी जि. भंडारा अनुपस्थित आहेत.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील क्र. २१८३/२०२० मध्ये दिनांक ०७.०९.२०२२ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थीस विहीत मुदतीत माहिती अधिकार अधिनियम कलम ७(६) नुसार माहिती विनामुल्य प्राप्त करुन घेण्यास पात्र ठरतात. विद्यमान जन माहिती अधिकारी, बोरगाव यांनी मौजा बोरगाव येथील गट क्र. ४८३,४८४, या शेतजमिनीवर फेरफार क्र. १५०९ व फेरफार क्र. ३६९ या बाबतील उपलब्ध असलेली संपूर्ण दस्ताऐवज अपिलार्थी यांना संपूर्ण नस्तीचे अवलोकन देवून त्यांना सदर माहिती आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत विनामुल्य प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी. असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.०१.२०२३ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. द्वितीय अपील क्र. २१८३/२०२० मध्ये दिनांक ०७.०९.२०२२ रोजी पारित आदेशात मौजा बोरगाव येथील गट क्र. ४८३,४८४,५४८ या शेतजमिनीवर फेरफार क्र. १५०९ व फेरफार क्र. ३६९ कोणत्या आधारावर झाले त्या संबधी तपशिलवार माहिती व दस्ताऐवज देणेबाबत माहिती मागितली आहे. त्यानुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय बोरगाव ता. पवनी जि. भंडारा यांनी दि. १३.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना १४३ पृष्ठांची माहिती प्रदान केली असून त्यांनी ती दि. २०.०१.२०२३ रोजी प्राप्त झाली असल्याची लेखी पोहच दिली आहे. सबब, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २५.१०.२०२३**

**जा.क्र.**-757-------**दि.**------------ 12 FEB 2024



E:\sSS तक्रार २५.१०.२०२३\३६-२०२३ वैद्य.docx